MHLA160000772009

**नियमित दिवाणी दावा क्र.५९/२००९**
**शकुंतलाबाई वि. वेंकट व ईतर**

-:: **नि.क्र.१ लगत आदेश** ::-

वादी हे गैरहजर आहेत. सन्माननीय उच्च न्यायालय यांनी सदर प्रकरण मुदतीत निकाली काढण्यासाठी आदेशित केलेले आहे. मी वेळोवेळी आदेश पारीत करून वादीने पुरावा नोंदवावा आणि प्रकरण लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी सहकार्य करावे असे निर्देश दिलेले आहेत. यापूर्वी वादीने कसूर केल्यामुळे मी आदेश दि.२३/१२/२०२५ प्रमाणे वादीच्या पुराव्याअभावी प्रकरण खारीज करण्याकरिता नेमले होते. परंतु त्यानंतर वादीने वेगवेगळे अर्ज देऊन प्रकरण लांबविले. दि.२१/०१/२०२६ रोजी वादीने पुरावा देण्यास कसूर केल्यामुळे प्रकरण खारीज करण्याकरिता नेमले. त्यानंतर दि.२३/०१/२०२६ रोजी वादी आजारी असल्याने प्रकरण तहकूब केले होते. आजरोजी प्रकरण तहकूब करण्यासाठी कोणतेही कारण नाही. वादीने स्वत:ची किंवा साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यास कसूर केलेला आहे. त्यामुळे दावा गुणवत्तेवर निकाली काढता येत नाही. सबब वादीने नोंद घ्यावी आणि पूर्तता करावी अन्यथा दावा काढून टाकण्यात येईल.

०२. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.01.28 17:14:26 +0530

**ठिकाण – देवणी**
**दिनांक – २८-०१-२०२६**

**( श.अ. सुरजुसे )**
**दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**देवणी.**